IIAIC

स्थापना : १९९९

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभाग मान्यताप्राप्त

स्थापना : २००८

सांकेतिक क्र. जे. १६.११.०१२

आय. आय. ए. आय. सी. चे.

# विनायकराव बीपाटील

## उच्च माध्यमिक कला व वाणिज्य महाविद्यालय (का. वि. अ.)

IIAIC Since : 1999

## (विना अनुदानित)

**U DISE – 27360308207**

ई-मेल : vbpjuniorcollege@gmail.com

वेबसाईट :- www.vbpjuniorcollege.com

# प्रवेश नियमावली व माहिती पत्रक

# इंडो इस्त्रायली ॲग्रो इंडस्ट्रिज चेंबर, मुंबई.

स्थापना : १९९९

नोंदणी क्र. : एफ-२२१३२

## विश्वस्त


- अध्यक्ष - श्री. विनायकराव भुसारे पाटील
- उपाध्यक्ष - श्री. चारर्लिस एम. लोपिस
- सचिव - सौ. चारुशिला सुहास जोशी
- सह. सचिव - सौ. मंगला विनायकराव भुसारेपाटील
- विश्वस्त - श्री सुरेश श्रीधर पाखरे
- विश्वस्त - श्री किरण बाळासाहेब देशमुख
- विश्वस्त - सौ. भारती शहाजीराव भोसले


---

स्थापना : २००८

सांकेतिक क्र. जे. १६.११.०९२

आय. आय. ए. आय. सी. चे.

# विनायकराव बीपाटील

## उच्च माध्यमिक कला व वाणिज्य महाविद्यालय (क. वि. अ.)

IIAIC

## कनिष्ठ महाविद्यालय : व्यवस्थापन समिती


- कार्याध्यक्ष - श्री. देवकिनंदन मदनमोहन व्यास
- संचालक– श्री. अभयसिंह विनायकराव भुसारेपाटील
- सदस्य – श्री. शेखर अच्युतराव सोमवंशी
- सदस्य – श्री. नारायण यमाजी तुवर
- सदस्य – श्री. नरेश लक्ष्मण कोरडा



- *विद्यालय कार्यालय प्रशिक्षण केंद्र, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, मु. पो. दापचरी, ता. डहाणू, जि. ठाणे.*
- *संपर्क : ८०८०८५८५८४ / ९६१९८५८५८४*

# पसायदान

आतां विश्र्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।

तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥१॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।

भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥२॥

दुरिताचें तिमिर जावो । विश्र्व स्वधर्मसूर्यें पाहो ।

जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ॥३॥

वर्षत सकळमंगळीं । ईश्र्वरनिष्ठांची मांदियाळी ।

अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥४॥

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।

बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥५॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।

ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥६॥

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।

भजिजो आदिपुरूखीं । अखंडीत ॥७॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।

दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥८॥

येथ म्हणे श्री विश्र्वेशरावो । हा होईल दानपसावो ।

येणे वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥९॥

----------

# प्रास्ताविक



मा. श्री. विनायकराव भुसारेपाटील

(संस्थापक अध्यक्ष)

इंडो इस्त्रायली अँग्रो इंडस्ट्रिज चेंबर या संस्थेची स्थापना सन १९९९ मध्ये धर्मदाय आयुक्तालयाच्या नोंदणी क्र. एफ-२२१३२ दि. २१/१/२००० अन्वये स्थापित्त झालेली संस्था आहे. इस्त्रायल देशासह जगातील कृषी आणि कृषी पुरक व्यवसायासह इतर सर्व प्रकारचे फायदेशीर व आर्थिक दृष्ट्या सबलत आणणारे तंत्रज्ञान, व्यवसाय, शिक्षण, संशोधन, अर्थसहाय्य, सांस्कृतिक, कार्यक्रम, कलाक्रिडा व इतर अनुषंगिक बाबींची देवघेव करून दोन्ही देशातील संबध सौहार्दपूर्ण वाढविणे आणि देशातील मुलां-मुलींचे / विद्यार्थ्यांचे/ सुशिक्षित बेरोजगारांचे / रहिवाश्यांचे / शेतकऱ्यांचे / व्यवसाइकांचे आरोग्य व आर्थिक सुधारणा करून त्यांना स्वंयपूर्ण करण्याचे विविध उपक्रम संस्थेचा उद्देशास पात्र राहून राबविणारी संस्था आहे.

या संस्थेने देश आणि विदेशात शैक्षणिक सहली, अभ्यास दौरे, प्रदर्शन भेटी-चर्चा सत्र, कौशल्यवृध्दी विषयक सेमिनार आणि राज्यात विविध ठिकाणी व्यवसाय वृध्दीसाठी कृषी व कृषीपूरक शैक्षणिक विद्यालय स्थापित केलेली आहेत.

संस्थेने स्वत:चा आणि संगणकिय तंत्रज्ञानावर आधारित कृषी माहिती तंत्रज्ञान व कृषी व्यापार तंत्रज्ञान हे दोन अभ्यासक्रम तयार करून शासन अंगिकृत असलेले महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व परीक्षा मंडळ यांना सादर करून मान्यता मिळविलेली आहे. हे अभ्यासक्रम महाराष्ट्रात एकूण ७ जिल्हयामध्ये सुरू असून चार महाविद्यालय दापचरी येथे सुरू आहेत.

या अभ्यासक्रमासाठी पालघर जिल्हयातील आदिवासी मुलांना प्रशिक्षण देण्याकामी शासनाच्या कृषी कोकण विभागीय कार्यालयाच्या अधिपत्या खाली दापचरी येथील राज्यस्तरीय फळरोपवाटिका येथील प्रात्यक्षिकसाठी पाच एकर क्षेत्र आणि प्रशिक्षण केंद्र मधील २ प्रशिक्षण हॉल, ४ वर्ग खोली, १ संगणक कक्ष, १ ग्रंथालय, २ कार्यालय, ३ वसतीगृह, ३ स्वच्छता गृह, १ भोजन गृह व क्रिडांगण इत्यादी बाबी नाममात्र भाडे दराने देऊन आमच्या उपक्रमांस सहकार्य केले आहे.

तसेच संस्थेने **कृषी माहिती व व्यापार तंत्रज्ञान महाविद्यालय** (स्थापना- २००७-०८) मध्ये विविध प्रकारचे १० कौशल्यवृध्दीव्दारे कुशल मनुष्यबळ निर्मितीचे शासनमान्य पार्टटाईम प्रशिक्षण ६ महिन्याचे कृषी विभागांशी निगडीत कोर्स प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेता येईल. संस्थेच्या कृषी शासनमान्य प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेतल्यास त्याला संस्थेच्या योजनेच्या आधारे इ. ११वी व इ.१२ वी उत्तीर्ण मुलांना रोजगार – स्वंयरोजगार देण्यात येणार असून आदिवासी भागातील मुलांचे राहणीमान सुधारून आर्थिक लाभ मिळणार आहे. असे दोन्ही शैक्षणिक लाभ प्रवेशार्थींना मिळणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने जूलै २००८ मध्ये संस्थेस **विनायकराव बीपाटील कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्याल (वि. अ.)** तत्वावर मान्यता देण्यात आली असून विद्यार्थी इयत्ता ११वी /१२वी कला व वाणिज्य शाखेचे शिक्षण घेत आहे. तसेच संस्थेने **विनायकराव बीपाटील व्यवसायिक अभियांत्रिकी व कौशल्यवृध्दी महाविद्यालय** सन २०१२-१३ संस्थेने व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे २ वर्ष कालावधीचे अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणासाठीचे +२स्तराची समकक्षतेचे ६ व्यवसायिक अभियांत्रिकी व कौशल्यवृध्दी अभ्यासक्रम सुरू केले आहे. याव्दारे आपल्याला रोजगार-स्वंयरोजगाराच्या हमीवर शासनमान्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

आपणांस विनंती की कृपया आपण आपला पाल्य, हितचिंतक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, सहकारी यांनी विद्यालयात भेट द्यावी, किंवा देण्याबाबत सूचना द्यावी आमचे उपक्रम / उद्देश समजावून घेऊन प्रवेश घेणे विषयक सूचना करावी हि विनंती.

# महाविद्यालयाची ठळक वैशिष्ठे

- उत्कृष्ट निकालाची परंपरा.
- ई-लर्निंग
- ई - अध्यापन साहित्य
- ई - शिक्षण सुविधा
- वर्क फ्रॉम होम सुविधा
- अध्यापनात सोशल माध्यामांचा समावेश
- सन २०१४ पासून अतिरिक्त जादा तुकडी कला शाखा वर्ग सुरू.
- समृध्द ग्रंथालय व वाचनालयाची सुविधा
- प्रशिक्षित, अनुभवी आणि वैयक्तिक लक्ष देणारे प्राध्यापक वर्ग.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, साहित्य व क्रीडा क्षेत्रातील निरनिराळे उपक्रम.
- महाविद्यालयात संगणक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण अनिवार्य तसेच महाविद्यालयात अभ्यासेत्तर उपक्रम राबविले जातात.
- विद्यार्थ्यास कौशल्यवृध्दी - व्यक्तीमत्व विकास आणि वरिष्ठ विषयतज्ञांचे मार्गदर्शन.
- प्राध्यापक व पालक यांच्यास सुसंवाद साधण्यासाठी वेळोवेळी पालक व विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन.
- इयत्ता १२वी च्या बोर्ड परीक्षेत उत्कृष्ठ गुणवत्ताधारकास संस्थेतर्फे पारीतोषिक व सवलत.
- शैक्षणिक सहलीचे आयोजन आणि स्पर्धा परीक्षांसाठी तज्ञाचे मार्गदर्शन
- व्यक्तिगत लक्ष व ज्यादा तासांची सोय.
- आधुनिक तंत्रज्ञानव्दारे एल.सी.डी. प्रोजेक्टर –संगणक –सी.डी. च्या माध्यमातून सखोल अध्यापनाचे विशेष तासिका.
- स्वच्छ व नसर्गरम्य परिसर
- ऑनलाईन प्रवेश सुविधा – www.vbpjuniorcollege.com
- महाविद्यालयाचे युटुब चॅनल
- फेसब्रुक लिंक

# महाविद्यालयाचा – एच.एस.सी बोर्डाचा निकाल

| महाविद्यालय वर्ष व टक्केवारी | | प्रथम आलेले विद्यार्थी व टक्केवारी | |
|---|---|---|---|
| १) प्रथम वर्ष - २०११ (कला) | ८१.८१% | १) कु. विशाल भुसारा (कला) | ७१% |
| २) व्दितीय वर्ष - २०१२ (कला) | ७७.७७% | २) कु. पुनम बोरसे (कला) | ६६% |
| ३) तृतिय वर्ष - २०१३ (कला) | ९३.७५% | ३) कु. मुनेश गडग (कला) | ७४% |
| ४) चतुर्थ वर्ष - २०१४ (कला) | ९२.८६% | ४) कु. कृष्णा सपाटे (कला) | ७३.६९% |
| चतुर्थ वर्ष - २०१४ (वाणिज्य) | ७७.२७% | ५) कु. दिपक आरज (वाणिज्य) | ७२.६२% |
| ५) पाचवे वर्ष - २०१५ (कला) | ९२.३८% | ६) कु. प्रमिला नम (कला) | ७१.६२% |
| पाचवे वर्ष - २०१५ (वाणिज्य) | ८८.००% | ७) कु. संपत भुजाडा (वाणिज्य) | ७०.६१% |
| ६) सहावे वर्ष - २०१६ (कला) | ७७.९७% | ८) कु. प्रमिला कोम (कला) ) | ६५.८४% |
| सहावे वर्ष - २०१६ (वाणिज्य) | ८७.८८% | ९) कु. काजल करबट (वाणिज्य) | ७२.९२% |
| ७) सातवे वर्ष - २०१७ (कला) | ९४.७४% | १०) कु. पुनम ठाकरे (कला) | ६८.७७% |
| सातवे वर्ष - २०१७ (वाणिज्य) | ९४.६२% | ११) कु. राहुल शिंगडा (वाणिज्य) | ७४.४६% |
| ८) आठवे वर्ष - २०१८ (कला) | ८५.७५% | १२) कु. मनिषा बेंडू खरपडे (कला) | ६९.०८% |
| आठवे वर्ष - २०१८ (वाणिज्य) | ९७.९५% | १३) कु. उमेश नन्हया दुमाडा (वाणिज्य) | ७६.३१% |
| ९) ९वे वर्ष - २०१९ (कला) | ८४.३५% | १४) कु. पिंकी जमू बोदले (कला) | ७०.७६% |
| ९वे वर्ष - २०१९ (वाणिज्य) | ८०.७२% | १५) कु. जयश्री सुभाष ओझरे | ७४.४६% |
| १०) १०वे वर्ष - २०२० (कला) | ९०.६९% | १६) कु. योगिता लखमा घोरखाना | ७१.०७% |
| ९वे वर्ष - २०२० (वाणिज्य) | ९१.६१% | १७) कु. सचिन सुरेश वरखंडया | ७७.६९% |
| | | | |
| | | | |

# विद्यार्थ्यांना अभ्यासेत्तर उपक्रम, विविध सुविधा व सवलती.

- **वृक्षारोपण : -** पर्यावरणाच्या वृक्षारोपण संबधी सर्व योजनेतून उपक्रम संस्थेच्या मदतीने झाडे लावा व जगवा उपक्रम.
- **सांस्कृतिक कार्यक्रम : -** सांस्कृतिक, कला व क्रिडा वार्षिक कार्यक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण.
- **सार्वजनिक उपक्रम : -** गणेशोत्सव व विविध शिबिरे.
- **शारीरिक शिक्षण व क्रिडा स्पर्धा : -** विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाच्या तासिकांना नियमितपणे हजर रहावे लागेल. स्पर्धेकरिता कबड्डी, खो-खो, धनुर्विद्या, नेमबाजी, व्हॉलीबॉल, हँडबॉल, बॅडमिंटन, कुस्ती, मैदानी खेळ (धावणे, फेकी, उड्या) इ. चा समावेश
- **संगणक विभाग :** सन २००९-१० पासून महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व परिक्षा मंडळ मान्यताप्राप्त ॲग्रो आय. टी. आणि ॲग्रो ई-कॉमर्स ६ महिन्याचा शासन प्रमाणपत्र अभ्यासक्रमात इ.११वी किंवा इ.१२वी शैक्षणिक अभ्यासक्रम शिकत असतांना इतर वेळी प्रशिक्षणामध्ये प्रवेश सुविधा.
- **शैक्षणिक सहल :** पहिल्या सत्रामध्ये शैक्षणिक व औद्योगिक, कृषी सहल आवश्यक विद्यार्थी संख्या झाल्यास आयोजित केली जाईल. सहल स्थळासंबधी घेतला जाणारा निर्णय हा सहल विभागाचा अंतिम राहील.
- **ग्रंथालय :** महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आज मितीस ३,९४४ ग्रंथ आहेत. अनेक दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, धार्मिक ग्रंथ, विविध योजनेव्दारे तसेच व्यक्ती संस्थाकडून आलेले भेट ग्रंथ आणि कृषी संबधी विविध देशातील ग्रंथ, माहितीचे ग्रंथ, मराठी शब्द कोश सी.डी.मध्ये उपल्बध याशिवाय विविध विषयांवरील नियतकालिके व वृत्तपत्र यांचा समावेश वरील संग्रहात आहे.
- **संगणक प्रायोगशाळा :** महाविद्यालयाच्या आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे संबधी सर्व संगणक, प्रिन्टर, वेबकॅमेरा, स्कॅनर, इंटरनेट सुविधा, नेटवर्क, यु.पी.एस., एल.सी.डी. प्रोजेक्टर, एल.सी.डी.कॅमेरा, विविध शैक्षणिक व्हिसीडी व ऑडिओ-व्हिडीओ सिस्टमसह परीपूर्ण वातानूकूलीत संगणक प्रायोगशाळा असून एक वेळी ३० विद्यार्थ्यांना बसण्याची सुविधा आहे.
- **पर्यावरण :** पर्यावरणाशी जोडून कनिष्ठ महाविद्यालय दापचरी येथील महाराष्ट्र शासनाच्या फलोत्पादन विभागा यांची बाजूलाच राज्यस्तरीय फळ रोप वाटिका आहे. तसेच ठाणे जिल्हयातील नसर्गरम्य पर्यावरणाच्या वृक्षारोपण संबधी सर्व योजनेतून उपक्रम संस्थेच्या मदतीने पर्यावरण सरंक्षणाचे उपक्रम राबिवले जातात.
- **ओळखपत्रे :** वर्षारंभी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने कार्यालयातून ओळखपत्र घेऊन त्यावर स्वत:चा फोटो लावून प्राचार्य व ग्रंथपालाची सही घ्यावी. १५ जुलैपर्यन्त ओळखपत्र घेणे आवश्यक आहे. ११वी च्या विद्यार्थ्यांना व नवीन विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागाच्या नियमानुसार अनामत रक्कम भरावी लागेल. ओळखपत्र हरवल्यास नवीन ओळखपत्र घेण्यासाठी रू.१००/- आकार भरावा लागेल. तसेच हरवलेल्या ओळखपत्राचा गैरवापर झाल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. महाविद्यालय सोडतांना ओळखपत्र परत करावे लागेल.
- **परिक्षा :** इयत्ता १२वी च्या गुणवत्ता वाढीसाठी सराव परीक्षेवर विशेष भर.
- **विनायक पॉर्टन :** विशेष सत्र अभ्यासिका इ.१२वीसाठी विनायक पॉर्टन
- **आरोग्य शिबीर :** प्रथम व व्दितीय सत्रामध्ये विद्यार्थीचे वैयक्तीक आरोग्य तपासणी शिबीर.
- **राष्ट्रीय नेत्यांची जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम**
- **विद्यार्थ्यासाठी शिक्षणतज्ज्ञांची वेबीनार / युटुब चॅनल व्दारे व्याख्याने**
- **कौशल्य विकास व शिक्षण प्रशिक्षण शिबिरे**

# महाविद्यालयातील प्रवेश क्षमता

| विद्याशाखा | वर्ग | तुकड्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| कला | अकरावी | २ | १६० |
| | बारावी | २ | १६० |
| वाणिज्य | अकरावी | १ | ८० |
| | बारावी | १ | ८० |

**अकरावी व बारावी कला शाखा अभ्यासक्रम** – एकूण आठ अभ्यासपत्रिका (विषय)

१) मराठी
२) इंग्रजी
३) अर्थशास्त्र
४) राज्यशास्त्र
५) इतिहास
६) भूगोल
७) पर्यावरण
८) शारीरीक शिक्षण

**अकरावी व बारावी वाणिज्य शाखा अभ्यासक्रम** – एकूण आठ अभ्यासपत्रिका (विषय)

१) मराठी
२) इंग्रजी
३) अर्थशास्त्र
४) सहकार
५) व्यापार संघटन
६) पुस्तकपालन व लेखाकर्म
७) पर्यावरण
८) शारीरीक शिक्षण

# प्रवेशासंबधी सूचना (ऑनलाईन प्रवेश सुविधा उपलब्ध)

www.vbpjuniorcollege.com

- शालांत परीक्षेचा निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकापासून ११ वीच्या वर्गात प्रवेश घेता येईल.
- ज्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा असेल त्या वर्षापूर्वीची परीक्षा अधिकृतपणे पास झाल्याचे गुणपत्रक, शाळेचा दाखला व तीच्या मूळ प्रतीच्या ४ सत्यप्रती तसेच विद्यार्थीचे १० फोटो प्रवेश अर्जासोबत जोडणे व खालील कागदपत्रे आवश्यक.
- प्रवेश अर्जावर नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता करून प्रवेश अर्ज पूर्ण करावा.
- माहितीपत्रक घेतल्यावर लवकरात लवकर प्रवेश निश्चित करावा.
- १२वी विद्यार्थ्यासाठी बोर्ड फी वेगळी आकारण्यात येईल.
- कनिष्ठ महाविद्यालय प्रवेश रद्द केल्यास कोणत्याही सबबीवर भरलेली फी परत केली जात नाही.
- प्रवेश रद्द करणे संबधी परिशिष्ट (अ) पहावे.
- सुट्टीनंतर कनिष्ठ महाविद्यालयात चालू होण्याच्या तारखांनाच सर्व विद्यार्थ्यांनी दिलेल्या तारखेला हजर राहणे आवश्यक आहे.
- प्रवेश निश्चित झाल्यावर मंडळ व शासन नियमानुसार ८५ टक्के हजेरी अनिवार्य आहे. अन्यथा परिक्षेस बसता येणार नाही.
- विविध खेळ खेळत असताना जखम झाल्यास त्याचा वैद्यकीय खर्च विद्यार्थ्यांना करायचा आहे.
- ज्या विद्यार्थ्यांची फी वेळेच्या आत न भरल्यास त्यास परिक्षेस बसू दिले जात नाही व कोणतेही कागदपत्रे मागणी करता येत नाही.
- जातपडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्री पूर्तता करून जातपडताळणीची प्रस्ताव सादर होण्यासाठी शिफारस पत्र देण्यात येईल. त्या आधारे विद्यार्थीने स्वतः ऑनलाईन अर्ज भरावा.
- प्रवेश घेतांना पुढील पूर्तता करणे आवश्यक आहे.

  अ) शाळा सोडल्याच्या दाखल्याची मूळप्रत व २ सत्यप्रती / झेरॉक्स.

  ब) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक मूळप्रत व त्यांची २ सत्यप्रती / झेरॉक्स.

  क) मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी पालकाचे उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्र (तहसिलदाराच्या सहीचे)

  ड) रेशनकार्डची २ झेरॉक्स प्रत / रहिवाशी दाखला.

  इ) कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यासाठी – दारिद्र्य रेषेखालील दाखला २ सत्यप्रती / झेरॉक्स.

  ई) जात प्रमाणपत्र जातपडताळणी प्रमाणपत्राच्या २ सत्यप्रती / झेरॉक्स.

  उ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाखेरीज इतर मंडळातील परीक्षा उत्तीर्ण असल्यास अशा विद्यार्थ्यांना

इलिजीबीलीटी सर्टीफीकेट व मंडळ सर्टीफिकेट आवश्यक आहे.

ल) डोमेशिल प्रमाणपत्र (शिष्यवृत्तीसाठी)

ऊ) फोटो ४ प्रती. (रंगीत)

ए) आधार कार्ड २ सत्यप्रती / झेरॉक्स.

- १२वीच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

  अ) महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची मूळप्रत व त्यांची २ सत्यप्रती.

  ब) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रकाच्या मूळप्रत व त्यांची २ सत्यप्रती.

  क) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पालकाचे उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्र (तहसिलदाराच्या सहीचे)

  ड) रेशनकार्डाची झेरॉक्स प्रत / रहिवाशी दाखला २ सत्यप्रती.

  इ) कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांसाठी – दारिद्र्य रेषेखालील दाखला २ सत्यप्रती.

  ई) जात प्रमाणपत्र / जातपडताळणी प्रमाणपत्र २ सत्यप्रती / झेरॉक्स.

  उ) ११ वी उत्तीर्ण गुणपत्रकाची २ सत्यप्रती / झेरॉक्स.

  ऊ) फोटो ४ प्रती. (रंगीत)

- अकरावीच्या विद्यार्थ्यांना एकदा निवडलेला विषय पुन्हा बदलता येणार नाही. तसेच कोणत्याही कारणास्तव तुकडी बदलता येणार नाही व पुढील शिक्षणासंबधी सर्व अधिकार मा. प्राचार्यांना राहील.
- कोणत्याही विद्यार्थ्यांचा प्रवेश विशिष्ट कारणासाठी नाकारण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना आहे.
- भाषा विषयाची पुस्तके सर्वांनी तासिकांना आणणे आवश्यक आहे.
- एस.सी., एस.टी. भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी पालकाची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा शासन निर्णयप्रमाणे असेल. सदर उत्पन्नाचा दाखला चालू वर्षापासून असावा.
- ओ.बी.सी., एन.टी., एस.बि.सी. भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी पालकाची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा शासन निर्णयप्रमाणे राहील. सदर उत्पन्नाचा दाखला चालू वर्षापासून असावा.
- मुळ दाखला व गुणपत्रकाच्या सत्यप्रती विद्यार्थ्यांनी स्वत:कडे ठेवण्यासाठी काढून घ्याव्यात. (झेरॉक्स मिळणार नाही)
- सतत तीन महिने गैरहजर राहिल्यास संबधीत विद्यार्थ्यांचे नांव कमी करण्यात येईल.
- महाविद्यालयाची वेबसाईटवर दिलेल्या माहिती व सूचना बाबत विद्यार्थीवर माहिती घेऊन पालन करणे बंधनकारक आहे.
- कृतीयुक्त अध्यापनासाठी आवश्यक साहित्य विद्यार्थ्यांना स्वतः आणणे आवश्यक राहिल.

# विविध सुविधा व फी सवलती

- आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी ज्यांच्या पालकांचे उत्पन्न शासन नियमानुसार असेल अशा विद्यार्थ्यांना आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांना फी सवलत दिली जाते. त्यासाठी विद्यार्थ्यांने फी सवलत अर्ज ऑनलाईन परिपूर्ण भरून देणे आवश्यक आहे.
- ५० टक्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे गुणवंत विद्यार्थी शिष्यवृती योजना लागू राहील. त्यासाठी विद्यार्थ्याने फी सवलतीचा अर्ज ऑनलाईन वेबसाईट व्दारे परिपूर्ण भरून देणे आवश्यक आहे.
- शासनाच्या नियमाप्रमाणे स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यास शासनाकडून शिष्यवृती दिली जाते.
- शारीरिकदृष्टया अंपग विद्यार्थ्यांना समाज कल्याण विकास विभागाकडून विशेष सेवा व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.
- अनुसुचित जाती / जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृती योजना लागू आहे. त्यासाठी ऑनलाईन शिष्यवृतीचा विहित नमुन्यातील अर्ज व संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करून देणे आवश्यक आहे.
- खेळ / क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक उपक्रम व इतर उपक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.
- अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी शासनाने नव्याने जाहिर केलेली शिष्यवृती योजना लागू आहे. त्यासाठी ऑनलाईन शिष्यवृतीसाठीचा विहीत नमुन्यातील अर्ज व संपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करून देणे आवश्यक आहे.
- शिष्यवृती व इतर आर्थिक सवलतीसाठी प्रवेशाच्यावेळी कार्यालयातील विहीत नमुन्यातील अर्ज व संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करून देणे आवश्यक आहे.
- शिष्यवृती ऑनलाईन वेळेत फॉर्म भरणे व फॉर्म प्रिन्ट कार्यालयात जमा करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक आहे. त्यासाठी आवश्यक राष्ट्रीयकृत बँकेत खाते असावे व आधार कार्ड असणे गरजेचे व अनिवार्य आहे. शिष्यवृती ऑनलाईन फॉर्म भरला नाहीतर त्यांची जबाबदारी विद्यार्थ्यांची - पालकांची राहील व शिष्यवृतीस पात्र ठरणार नाही.
- **आवश्यक कागदपत्रे – १. जातिचा मूळ दाखला व त्याच्या छायाकित प्रती, २. जातपडताळणीचा दाखला व त्याच्या छायांकित प्रती, ३. उत्पन्नाचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र व त्याच्या छायांकित प्रती, ४. रहिवाशी दाखला / रेशन कार्डची छायांकित प्रत, ५. शैक्षणिक गुणपत्र, ६. शाळा सोडल्याचा दाखला (एस.एस.सी. पासून), ७. फोटो, ८.डोमोशिल प्रमाणपत्र, ९. बँक पासबुक प्रथम पानाची झेरॉक्स व १०) बोनाफाईड**

*वरील सर्व सवलत व सुविधा प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी निर्धारीत वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्ततेसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच जे विद्यार्थी वरील पैकी कोणताही अर्ज निर्धारित वेळेत सादर करणार नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांना फी भरणारे विद्यार्थी म्हणून गणले जाईल.*

# महाविद्यालात प्रवेश अटी व नियम

१) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांने स्वत:चे छायाचित्र असलेले व प्राचार्यांची सही असलेले ओळखपत्र लेसच्या साह्याने गळ्यात घालणे आवश्यक आहे व महाविद्यालय परिसर, बस थांबा इत्यादी ठिकाणी शांतता राखली पाहिजे.

२) शिक्षण मंडळाने निर्धारित केलेले योग्य ते शुल्क नियमानुसार प्रवेश घेतेवेळी भरणे आवश्यक आहे. या संदर्भात फी भरण्यास सवलत हवी असल्यास प्राचार्यांच्या पूर्व परवानगीने ती घेता येईल.

३) आपला प्रवेश केवळ एक वर्षासाठी असून पुढच्या वर्गात प्रवेश घेतेवेळी नव्याने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. तसेच प्रवेश त्वरीत रद्द केल्यास योग्य ती फी परत मिळविण्यास विद्यार्थी पात्र असतील मात्र प्रवेश निश्चित झाल्यावर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास फी परत मिळणार नाही.

४) प्रत्येक विद्यार्थ्याला कनिष्ठ महाविद्यालयाने निश्चित केलेल्या कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

५) विद्यार्थ्यांनी सर्व तासिकांना नियमित उपस्थित राहणे अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ८५ टक्कयापेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही. तसेच वर्ग चालू असतांना बाहेरील विद्यार्थ्याने विनापरवानगी आत प्रवेश करू नये.

६) प्रत्येक वर्गात गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रतिनिधी मंडळात वर्गप्रतिनिधी म्हणून नियुक्त केले जाते.

७) मोबाईल चा गैरवापर केल्याचे आढळल्यास रू. २००/- दंड केला जाईल.

८) महाविद्यालयाच्या आवारात धुम्रपान, पान, गुटखा, तंबाखू इ. खाण्यस सक्त मनाई आहे.

९) महाविद्यालयाच्या आवारात संस्थेच्या वस्तूची तोडफोड किंवा नासधूस करण्याचा प्रयत्न केल्यास वा तसे कृत्य एखाद्या विद्यार्थ्याकडून झाल्यास अशा विद्यार्थ्यावर दंडात्मक आणि कायदेशीर कार्यवाही केली जाईल व होणारे नुकसान भरपाईस पात्र राहील.

१०) स्वाध्याय, घटकचाचणी, सत्रपरीक्षा व प्रात्याक्षिक यासाठी परीक्षेत गुण ठेवलेले असतात. यामध्ये विद्यार्थी गैरहजर असेल तर त्याची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही. ११वीचे वार्षिक निकालपत्र बोर्डाच्या परिपत्रकाप्रमाणे तयार केले असून विद्यार्थी व पालकांनी दखल घ्यावी.

११) प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथालय व कार्यालयीन सेवक वर्गाच्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आणि महाविद्यालयाशी व संस्थेशी संबधित असलेली कोणतीही माहिती अथवा वृत्त प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय वृत्तपत्रामध्ये अथवा अन्यत्र प्रसिध्दीसाठी देऊ नये.

१२) विद्यार्थ्याने महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर तेथील आचारसंहितेचे व वेळोवेळी अंमलात आणल्या जाणाऱ्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. कोणत्याही विद्यार्थ्याची वागणूक अशोभनीय वाटल्यास त्या विद्यार्थ्यांला महाविद्यालयातून काढले जाईल अगर अनुरूप शिक्षा केली जाईल याबाबतीत प्राचार्यांचा निर्णय अंतिम असेल.

१३) वरील नियमात स्पष्टपणे अंतर्भूत नसलेल्या बाबी संबधीचा निर्णय प्राचार्यांच्या अधिकार क्षेत्रातील आहे. तसेच सर्व सूचनांचे पालन करण्याची हमी देणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल. यादी नोंद घेऊन विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित करावा.

१४) क्षेत्रभेट अंतर्गत येणाऱ्या शैक्षणिक सहलीस येणे सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील त्यासाठी येणारा सर्व खर्च विद्यार्थ्याला स्वत:ला करावा लागेल. तसेच क्षेत्रभेटीचे ठिकाण सहल विभाग व विद्यार्थी प्रतिनिधी निर्णय अंतिम राहील.

१५) कोणत्याही विद्यार्थ्यांकडून त्याच्या वर्गाच्या संस्था प्रमुखाच्या शिफारशीचा सद्वर्तनाचा दाखला मागण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.

१६) एक महिन्याच्या आत गुणपत्रक, प्रमाणपत्र न्यावेत अन्यथा वर्षाला रू. २०/- प्रमाणे आकार पडेल मात्र डुबलिकेट साठी फी मंडळ नियमानुसार भरावी लागेल.

१७) फी तपशिलप्रमाणे संपूर्ण फी प्रवेश घेतल्याच्या दिनांकपासूनच लागू होते यांची विद्यार्थांनी नोंद घ्यावी.

१८) प्रवेश धारकांस एकूण फी दोन हाप्त्यात फी भरण्यास मुभा राहील. प्रथम प्रवेश घेतेवेळी ५० टक्के उर्वरित ५० टक्के दिवाळीसुट्टीपूर्वी भरणे आवश्यक राहील.

१९) मुदतीत फी न भरल्यास संस्थेच्या / कनिष्ठ महाविद्यालयातील कुठल्याही सुविधा मिळणार नाही त्याबाबत विद्यार्थ्यास / पालकास तक्रार करता येणार नाही.

२०) प्रवेश धारकांस फी भरणे / देणे बंधनकारक राहिल.

२१) महाविद्यालयात प्रवेश निश्चित झाल्यावर १५ दिवसांत गणवेश परिधान करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील अन्यथा १००/- रू. दंड आकारला जाईल.

२२) महाविद्यालय सोडतांना क्लिअरंस फॉर्म भरणे अनिवार्य राहील.

***वरिल सर्व नियम अटीचे पालन करण्याची हमी देणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल यांची नोंद घेऊन विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित करावा.***

# शैक्षणीक वर्षातील परीक्षेचे अंदाजे वेळापत्रक व शैक्षणिक मुल्यमापन

## परीक्षा वेळापत्रक

**अ) प्रथम सत्र**

| | |
|---|---|
| १) १ला स्वाध्याय / प्रकल्प अहवाल /क्षेत्रभेट/ सेमिनार | ऑगस्ट |
| २) २रा स्वाध्याय | सप्टेंबर |
| ३) घटक चाचणी क्र. १ | सप्टेंबर |
| ४) सहामाही परीक्षा | ऑक्टोबर |

**ब) व्दितीय सत्र**

| | |
|---|---|
| १) ३रा स्वाध्याय / प्रकल्प अहवाल /क्षेत्रभेट/ सेमिनार | डिसेंबर |
| २) ४था स्वाध्याय | जानेवारी |
| ३) घटक चाचणी क्र. २ | फेब्रुवारी |
| ४) वार्षिक परीक्षा | मार्च |

दुसऱ्या सत्रात इयत्ता बारावी कला व वाणिज्य शाखेची पूर्व परीक्षा जानेवारी च्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येईल.

टिप :- १) वरील वेळापत्रकात ऐनवेळी बदल होऊ शकतो. तशी पूर्वसुचना देण्यात येईल.
२) शासन /मंडळ वेळो वेळी नविन धोरणानुसार बदल केला जाऊ शकतो.

# शैक्षणिक मुल्यमापन

## (दि.२५/५/२०१२ च्या शासकिय परिपत्रकानुसार)

### अ. प्रथम सत्र

| अ. क्र. | विषय | अंतर्गत मुल्यमापन गुण | सेमिनार-घटक चाचणी-टयुटोरियल गुण | प्रथम सत्र (लेखी ) गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी /इंग्रजी | २५ | २५ | ५० | १०० |
| २ | इतिहास / राज्यशास्त्र/अर्थशास्त्र, सहकार, व्यापर संघटन/पुस्तक पालन लेखाखर्म | २५ | २५ | ५० | १०० |
| ३ | भूगोल | २५ | २५ | ५० | १०० |
| ४ | पर्यावरण | २० | ३० | - | ५० |
| ५ | शा. शिक्षण | २५ | - | २५ | ५० |

### ब. व्दितीय सत्र

| अ. क्र. | विषय | अंतर्गत मुल्यमापन प्रात्यक्षिक/तोंडी | व्दितीय सत्र (लेखी ) गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी/इंग्रजी | २० | ८० | १०० |
| २ | इतिहास / राज्यशास्त्र/अर्थशास्त्र, सहकार, व्यापर संघटन/पुस्तक पालन लेखाखर्म | २० | ८० | १०० |
| ३ | भूगोल | २० | ८० | १०० |
| ४ | पर्यावरण | २० + ३० | - | ५० |
| ५ | शाररीक शिक्षण | २५ | २५ | ५० |

- **प्रथम सत्र १०० व व्दितीय १०० एकूण २०० पैकी सरासरी ३५ टक्के गुण प्रत्येक विषयात पास होण्यास आवश्यक आहे.**
- **पर्यावरण- दोन्ही सत्र १०० पैकी ३५ गुण आवश्यक आहे.**
- **शा. शिक्षण या विषयाला मंडळ नियमानुसार श्रेणी दिली जाईल.**
- **२० गुणांसाठीचे प्रकल्प पुस्तिका महाविद्यालयात उपलब्ध आहे. सर्वांना प्रत्येकी विषयास एकूण ७ प्रकल्प पुस्तिका घेणे अनिवार्य आहे.**
- **इ.१२वी वार्षिक मुल्यमापन मंडळाच्या नियमानुसार अनिवार्य राहील.**

# विविध सवलत

- ११वी व १२वी कला शाखेत विशेष संगणक तासिका.
- शासनमान्य कौशल्य विकास प्रशिक्षण ॲग्रो आय.टी. किंवा ॲग्रो ई-कॉमर्स प्रवेशावर ११ वी किंवा १२ वी शिक्षण मोफत.
- तसेच गरजू विद्यार्थ्यांना पार्टटाईम विषयानुसार क्लासेसची सुविधा.
- डहाणू-तलासरी-डहाणू महामार्गवर एस.टी. बस सवलत पास सुविधा.
- मुलींसाठी मानव विकास अंतर्गत संपुर्ण मोफत पास सुविधा.
- संस्थेचे तंत्र विद्यालयात एकूण १४ प्रकारचे विविध पार्टटाईम शासनमान्य व्यवसाय प्रमाणपत्र प्रशिक्षण.
- रोजगार व स्वंयरोजगार करणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण.
- २ वर्षीय पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे व्यवसायिक अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू.
- ई - अध्यापन, साहित्य, ई लर्निंग, ई-शिक्षण, वर्क फ्रॉम होम, सोशल मिडीयाचा शिक्षणात उपयोग

# अभ्यास व अभ्यासेत्तर उपक्रमाचे नियोजन

**१५ जून प्रथम सत्रारंभ – अभ्यासेत्तर उपक्रम** – जून मध्ये प्राचार्यांचे अभिभाषण

| | | |
|---|---|---|
| **जुलै** | - | ११वी विद्यार्थ्यांचा सुस्वागतमाचा कार्यक्रम<br>वाङ्मय मंडळ उद्घाटन<br>विद्यार्थीनी मंडळ उद्घाटन (व्याख्यान)<br>विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबीर |
| **ऑगस्ट** | - | कला मंडळ उद्घाटन<br>स्वातंत्र्य दिन समारंभ<br>रक्षा बंधन<br>क्रीडा स्पर्धा<br>पालक शिक्षक मेळावा |
| **सप्टेंबर** | - | शिक्षक दिन<br>हिंदी दिवस समारंभ<br>वाड्:मय मंडळामार्फत निबंध लेखन स्पर्धा<br>आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन<br>क्रीडा स्पर्धा |
| **ऑक्टोबर** | - | महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती |
| **नोव्हेंबर** | - | महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी |
| **डिसेंबर** | - | कला मंडळ कार्यक्रम<br>वाङ्मय मंडळ कार्यक्रम |
| **जानेवारी** | - | विद्यार्थी मंडळ कार्यक्रम<br>मकर संक्रांत कार्यक्रम<br>तज्ञ व्याख्यात्याचे व्याख्याने<br>प्रजासत्ताक दिन सोहळा<br>गांधी पुण्यतिथी (हुतात्मा दिन)<br>पालक शिक्षक मेळावा, वार्षिक स्नेह संमेलन<br>१२वीच्या विद्यार्थ्यांचा आशिर्वाद सोहळा |
| **फेब्रुवारी** | - | छत्रपती शिवाजी महाराज जयंती |
| **एप्रिल** | - | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबडेकर जयंती |
| **मे** | - | महाराष्ट्र दिन |

# हमीपत्र

प्रति,

मा. प्राचार्य,

आय.आय.ए.आय.सीचे विनायकराव बीपाटील

उच्च माध्यमिक कला व वाणिज्य महाविद्यालय,

विषय : शैक्षणिक वर्ष मध्ये या वर्षात प्रवेश घेतल्यानुसार फी माफी / शिष्यवृत्ती योजने अंतर्गत सवलत मिळणे बाबत........

१. अनुसुचित जमाती, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय संवर्गातील विद्यार्थी.

२. आर्थिक दृष्टया मागासवर्गीय विद्यार्थी.

३. प्राथमिक शिक्षकांचे पाल्य.

४. माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षकांचे पाल्य.

५. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची मुले.

६. स्वातंत्र्य सैनिकांची पाल्ये.

महोदय,

उच्च माध्यमिक प्रवेश घेतवेळी फी माफी / शिष्यवृत्तीची सवलत मिळण्यासाठी मी आपणांस या अर्जव्दारे विनंती करतो की, सदर लागणारी खालील कागदपत्रे प्रवेश घेतल्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत सादर करीन अशी मी हमी देतो / देते. तसेच मी स्वत: ऑन लाईन फॉर्म भरण्याची सर्व जबाबदारी माझी असेल व फॉर्म प्रिन्ट आऊट सोबत आवश्यक कागदपत्रे देण्याची हमी व जबाबदारी माझी राहिल.

अन्यथा मला संपूर्ण फी भरावी लागेल किंवा माझा प्रवेश आपोआप पूर्व सूचने शिवाय रद्द होऊ शकतो. याची माला जाणीव आहे.याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. याची या पत्राव्दारे मी हमी देतो /देते. की आवश्यक कागदपत्रे मूळ व सत्यप्रती सादर करण्यात येतील.

१. विहित नमुन्यातील पूर्ण भरलेला अर्ज
२. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटोग्राफ – १ प्रत.
३. मागील वर्षी आणि झालेल्या परीक्षेचे (गुणपत्रिका व शाळा सोडल्याचा दाखला) सत्यप्रत.
४. जातीचे प्रमाणपत्र (सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले सत्यपत्र)
५. तहसीदार किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
६. रेशन कार्ड सत्यप्रत.
७. आवश्यक असल्यास गत शैक्षणिक वर्षात खंड असल्यास आवश्यक गॅप अॅफिडेव्हिट
८. महाविद्यालय बदल केल्या असल्यास मागील वर्षी मिळालेल्या शिष्यवृत्ती / फ्री शिपचा मान्यता क्रमांक, दिनांक व रक्कम.
९. प्रवेश फी पावती सत्यप्रत.
१०. राष्ट्रीयकृत बँक पास बुक पहिले पान किंवा सीबीएस प्रणाली बचत खते पासबुक पहिले पानाची सत्यप्रत.
११. आधार कार्ड किंवा त्यासाठी अर्ज केल्यास पोचपावतीची सत्यप्रत.
१२. डोमोशिएल प्रमाणपत्र.
१३. शासन नियमानुसार बदल झालेले प्रमाणपत्रे.

वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे मी वेळत सादर करेन. कृपया माझा अर्जाचा विचार करून सध्या सवलत द्यावी हि आपणांस नम्र विनंती,

आपला /आपली विश्वासू,

पालकांची सही

विद्यार्थ्यांची सही:...............................................

नांव : ...............................................

## UNDERTAKING

Ragging within or outside of any educational institution is prohibited as per

1) Maharashtra Act No.XXXII of 1999
2) Govt. Circular No. 2005/238 (05) dt. 18.7.2007
3) University of Mumbai circular No. C.M./436/2007 dt. 29.10.2007

I am aware about the law and agree to abide by the same. I assure the institution that I will not indulge in such kind of activity.

________________________ ________________________

(Signature / Thumb) (Signature)

(Parents)

Name: ______________________________

Class: ____________ Roll No. ____________

..........................................................................................................................................

## UNDERTAKING

Possession & USE OF MOBILE / CELL PHONE in the college premises in fully prohibited.

I am aware about the rule and agree to abide by the same.

________________________ ________________________

(Signature / Thumb) (Signature)

(Parents)

Name: ______________________________

Class: ____________ Roll No. ____________